मा. कोर्ट प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सोलापुर ग्रामीण **P.S.**(ठाणे): माढा
**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0198 **Year** (वर्ष): 2022
**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 06/09/2022 23:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
1. **Day**(दिवस): दरमियानी दिन
**Time Period** (कालावधी):
**Date From** (दिनांक पासून): 30/08/2022
**Date To** ( दिनांक पर्यंत): 06/09/2022
**Time From** (वेळेपासून): 13:39 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 12:44 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 06/09/2022 **Time** (वेळ): 23:27 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 032
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 06/09/2022 23:04 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
दक्षिण, 1 किमी **Beat No.** (बिट क्र.):
(b) **Address** (पत्ता): माढा एसटी बसस्थानक,समोरील येवले चहाच्या शेजारील, हटेल स्वप्नपुर्तीमध्ये,माढा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. विजय सोपान काळे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1966
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | दारफळ सिना, ,ता माढा,माढा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | दारफळ सिना, ,ता माढा,माढा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष पांडुरंग सावंत | | | 1. धर्माधिकारी प्लट,गणेश मंदिरा जवळ,परांडा रोड बार्शी,ता बार्शी,माढा ,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | अनिल मधुकर चव्हाण | | | 1. शंभर फुटी रोड, नाईकवाडी प्लट,,बार्शी,माढा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि. 06.09.2022 मी श्री. विजय सोपान काळे, वय-56 वर्षे, व्यवसाय-शिक्षक, रा. दारफळ सिना, ता. माढा, जि. सोलापूर (मो.नं.9623415047, 8530234155) समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहणेस असुन, माझे वडील नामे सोपान भानुदास काळे हे सन 2012 साली मयत झाले असुन त्यांनी मृत्युपुर्वी मौजे दारफळ सिना हद्दीतील मिळकत क्रमांक 298 व 330 तसेच प्लट क्र.879 हे माझे नावे बक्षीसपत्र करुन दिलेले आहेत. सदर बक्षीसपत्राप्रमाणे सन 2012 साली मा. उपअधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय माढा येथे रितसर माझ्या नावाची नोंद झालेली असुन त्याबाबतचे उत्तारे देखील मला मिळालेले आहेत. सदर भुमि अभिलेख कार्यालय माढा यांचेकडील नोंदी प्रमाणे मी मौजे दारफळ सिना येथील ग्रामपंचायत कार्यालयाकडे दप्तरी नोंद लावणे कामी वेळो-वेळी अर्ज केले होते. परंतु प्रत्येक वेळी माझ्या अर्जामध्ये काहीतरी त्रुटी असल्याचे सांगुण माझी नोंद केलेली नव्हती. दि.25.07.2022 रोजी मी माझ्या घरी असताना सावंत व चव्हाण असे दोन व्यक्ती माझे घरी येवून मला त्यांनी मौजे दारफळ सिना येथील ग्रामपंचायत कार्यालयाकडून तुमच्या जागेचा/घराचा फेरसर्व्हे करणेकामी आलो असलेबाबत सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी मिळकत क्र. 298 व 330 तसेच प्लट क्र.879 या जागेचा सर्व्हे केला. सदर मिळकतीचे कागदपत्रे दाखविण्यास सांगितले. त्यावेळी मी माझ्या वडीलांनी करुन दिलेले बक्षीसपत्र त्यांना दाखवले. तेव्हा सदर मिळकतीवर तुमचे नाव लावण्यासाठी बक्षीसपत्राची झेरक्स काढून ठेवा आम्ही आमच्या साहेबांना सदरचे बक्षिसपत्र दाखवून चर्चा करुन सदर मिळकतीवर तुमच्या नावाची नोंद लावतो असे सांगितले. त्यानंतर दि.13.08.2022 रोजी सावंत व चव्हाण असे दोघेजण पुन्हा माझ्या घरी येवून आम्ही साहेबांशी बोललो असुन तुमच्या मिळकतीवर बक्षीसपत्राप्रमाणे वडीलांच्या नावाच्या ठिकाणी तुमच्या नावाची नोंद लावतो असे सांगुण माझ्याकडून बक्षीसपत्राची झेराक्स प्रत घेवून नाव नोंदणीकामी 12,000/- रुपये लागतील असे सांगितले. त्यापैकी 10,000/- रुपये आता दयावे लागतील व उर्वरित 2000/- रुपये हे उतान्यावर नोंद लावले नंतर दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळेस मी त्यांना सध्या माझ्याकडे एवढे पैसे नाहीत, माझा पगार झालेला नाही तसेच माझी पत्नी ही सध्या आजारी असल्याने ती मुंबई येथे टाटा मेमोरियल येथे उपचार घेत आहे. त्यामुळे मी त्यांना पैसे देण्यासाठी थोडा कालावधी दया असे विनंती केली. त्यावेळेस त्यांनी मला सदर मिळकतीवर नावाची नोंद लावणेकामी काही अडचणी येवू नये यासाठी सदर तीन जागेचे मागील तीन महिन्याच्या आतील भुमि अभिलेख कार्यालयाकडील उतारे आणुन देणेबाबत सांगितले. त्यानंतर काही दिवसांनी सावंत व चव्हाण हे मला पुन्हा फोन करुन तुमचे काम लवकर करायचे आहे त्यासाठी भुमि अभिलेख कार्यालयाकडील उतारे लवकर आणुन दया असे बोलत होते. सदरबाबत मी चौकशी केली असता मिळकतीवर नोंद लावणेकामी कोणत्याही प्रकारची फि लागत नसल्याचे मला माहिती मिळाली. त्यामुळे सावंत व चव्हाण हे माझ्याकडे मागत असलेली रक्कम ही लाचेची असल्याबाबत माझी खात्री झाली. तरी माझ्याकडे लाच मागत असलेले सावंत व चव्हाण यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अशी तोंडी तक्रार अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथील पोनि कोळी यांना दि.27.08.2022 रोजी समक्ष सांगितली. त्यानुसार पोनि कोळी यांनी माझे विनंतीवरुन दि.30.08.2022 रोजी त्यांच्यावर कारवाई करण्याचे ठरविले. त्यावर पोनि कोळी यांनी मला दिनांक 30.08.2022 रोजी सकाळी 13.30 वा. माढा गावाचे आलीकडे 2 कि.मी. विठ्ठलवाडीकडे जाणाऱ्या रोडच्या कडेला येवून थांबण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी दिनांक 30.08.2022 रोजी सकाळी 13.30 वा. माढा गावाचे आलीकडे 2 कि.मी. विठ्ठलवाडीकडे जाणाऱ्या रोडच्या कडेला येवून थांबलो. त्यावेळेस पोनि/चंद्रकांत कोळी हे त्यांचे स्टाफसह तेथे शासकीय वाहनाने आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी त्यांचे स्टाफला शासकीय वाहनमुधन खाली उतरुन बाजुला थांबण्याच्या सूचना देवून मला वाहनामध्ये बोलावून घेवून त्यांची व तेथे

उपलब्ध असलेले नगरपरिषद मोहोळ यांचे कार्यालयातील शासकीय पंच जाधव व स्वामी यांची ओळख करुन दिली व त्यानंतर पंच क्र.1 म्हणून श्री. दिलीप जाधव व पंच क्र.2 म्हणून श्री. किशोर स्वामी असे काम करण्याचे ठरवले. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता, मी खाजगी फेर सर्वेअर सावंत व चव्हाण यांचे विरुध्दची वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि कोळी यांचे सांगणेवरुन पंचासमक्ष मी माझी तक्रार लिहुन दिली. सदरची लेखी तक्रार पोनि कोळी व दोन्ही पंचानी वाचून त्यावर सह्या केल्या. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला खाजगी फेर सर्वेअर सावंत व चव्हाण यांची भेट कोठे होईल असे विचारले असता त्याबाबत खात्री करण्यासाठी त्यांना फोन करावा लागेल असे सांगितले त्यामुळे खाजगी सर्वेअर सावंत व चव्हाण यांची माढा येथे नेमके कोणत्या ठिकाणी भेट होईल यांची खात्री करण्यासाठी पोनि कोळी यांचे सुचनेवरुन सावंत यांना कल करण्याचे ठरले व सदरचा कल व्हाईस रेकर्डव्दारे रेकर्डींग करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यासाठी आम्हास व्हाईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये 8 जी.बी. चे नविन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरुन मी माझा मोबाईल क्र. 8530234155 वरुन खाजगी इसम सावंत यांचा मो.क्र.9657490956 वर फोन केला. त्यावेळेस पोनि कोळी यांनी त्यांचे ताब्यातील व्हाईस रेकर्डर चालु केले. त्या दरम्यान खाजगी इसम सावंत यांनी मला अर्धा-पाऊन तास लागेल माढयामध्ये यायला तुम्हाला... आलेका फोन लावतो.. असे संभाषण करुन फोन बंद केला. त्याचवेळेस पोनि कोळी यांनी त्यांचे ताब्यातील व्हाईस रेकर्डरचे बटन बंद केले ती वेळ 13.49 वा. ची होती. त्यानंतर सुमार 14.21 वा. सुमारास खाजगी फेर सर्वेअर सावंत यांनी त्यांचा मोबाईल क्र. 9657490956 वरुन माझा मोबाईल क्र. 8530234155 वर फोन केला त्यावेळी पोनि कोळी यांनी पुन्हा त्यांचे ताब्यातील व्हाईस रेकर्डरव्दारे रेकर्डींग केले. सदर रेकर्डींगमध्ये सावंत यांनी मला माढा येथील स्टण्ड समोर येवले चहाच्या शेजारील हटेलमध्ये येणेबाबत सांगितले असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी दिलेल्या तक्रारीची सदर ठिकाणी जावुन पडताळणी करण्याचे ठरवले. पोनि कोळी यांनी मला व माझ्या सोबत पंच क्र.1 जाधव यांना सुचना दिल्या की, तक्रारदार काळे यांनी खाजगी इसम फेर सर्वेअर सावंत व चव्हाण यांची येवले चहाच्या शेजारील हटेल या ठिकाणी भेट घेवुन त्यांच्याशी माझे नाव नोंदणी कामाबाबत चर्चा करावी. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्यावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे, अश्या सविस्तर सुचना मला दिल्या व पंच क्र.1 जाधव यांना माझ्या सोबत हजर राहुन फेर सर्व्हेवर सावंत व चव्हाण व माझ्यामध्ये होणारे संभाषण ऐकावे अशा सुचना दिल्या. त्यानंतर पोनि कोळी यांनी व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्या गळ्यात शर्टचे आत बनियानच्या आतील बाजूस अडकवून मला व पंच क्र.1 जाधव यांना माढा एस.टी. स्टण्ड समोरील येवले चहाच्या शेजारील हटेल येथे, माझ्याकडील टि.व्ही.एस. स्टार कंपनीची मोटार सायकल क्रं. एम.एच.45 ए.एन.2754 या दुचाकी वरुन 14.25 वा. पाठवले. त्याप्रमाणे मी, पंच क्र.1 जाधव यांच्यासह माढा एस.टी. स्टण्ड समोरील येवले चहाच्या शेजारील हटेल येथे जावुन माझे नाव नोंदणीबाबत विचारणा करुन मी माझ्या कामाबाबत साहेबांशी चर्चा केली का अशी विचारणा केली असता, खाजगी इसम फेर सर्वेअर सावंत म्हणाले की, चर्चा केली सगळं झालय, त्यावर मी त्यांना कोणाशी चर्चा केली असे विचारले असता, सावंत म्हणाले की, विस्तार अधिकारी असतो, ग्रामसेवक असतो असे सांगितले. त्यानंतर सावंत म्हणाले की त्या दिवशी मी तुम्हाला काय म्हणलं साहेब मला कागद पुढं दाखवू दे चर्चा करु दया असे म्हणाले. त्यावर मी त्यांना ते साहेब सही करतो म्हणले ना असे विचारले असता, त्यावर सावंत म्हणाले की, आओ उताराच दयाचा तुम्हाला हो.. अशी म्हणाले. त्यानंतर इतर चर्चा करुन मी सावंत यांना अधिकाऱ्याला किती आणि तुम्हाला किती घेणार ते सांगाना असे विचारले. त्यावर सावंत म्हणाले की, तसं नसतं बोलता येत नसतंय सर आता तुम्हाला बारा सांगितलेत दोन तुम्हाला ठेवायचे आहेत ते नंतर घेणार. त्यावर मी त्यांना बारा म्हणजे बारा हजार विचारले असता, सावंत म्हणाले की, बारा हजार त्यात ते दोन नंतर घेणार. त्यावर मी त्यांना सांगितले की, माझ्या बायकोला कन्सर आहे तुम्हाला माहित आहे ना तुम्ही काहीतरी कमी करा माझी परिस्थिती तशी नाही. त्यावर सावंत म्हणाले की, काय कमी करायच सांगा, त्यावर मी त्यांना काही तरी कमी करा आता. त्यावर सावंत दोन कमी करा व दहा दया म्हणाले. त्यावर मी त्यांना आता किती दयायचे असे विचारले असता, त्यावर सावंत आठ दयाचे म्हणाले. त्यावर मी पुन्हा त्यांना आठ म्हणजे आठ हजार का असे विचारले असता, त्यावर सावंत आठ हजार म्हणाले. त्यानंतर मी सावंत व चव्हाण यांना मित्राकडून पैसे घेवून येतो असे सांगुन मी व पंच क्र.1 जाधव असे पोनि. कोळी थांबले होते त्याठिकाणी परत आलो. तेथे पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकर्डर काढून बंद करुन पंच क्र. 1 जाधव व मला हकीकत विचारुन घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्तप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर, पोनि कोळी यांनी व पंचांना व्हईस रेकर्डरमध्ये माझ्यात व खाजगी इसम फेर सर्वेअर सावंत व चव्हाण यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये सावंत यांनी ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांना सांगुन बक्षीसपत्राप्रमाणे

पोनि कोळी व सापळा पथकास दिसेल अशा पध्दतीने लाच रक्कम स्विकारलेबाबतचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी पंच क्र.2 स्वामी यांचेसह सदर हॉटलेमध्ये येवुन सावंत व चव्हाण यांना रंगेहात पकडले ती वेळ 12.44 वा. ची होती. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरुन पंच क्र.2 स्वामी यांनी सावंत व चव्हाण यांना लाचेची रक्कम 8000/- रुपये बाबत विचारले असता सदरची रक्कम सावंत यांनी त्यांच्या उजव्या हातातील लाचेची रक्कम समोर धरली. सदरची लाच रक्कम पंच क्र.2 स्वामी यांनी ताब्यात घेवुन नोटांची यापुर्वी नमूद केलेल्या नोटांच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी सावंत व चव्हाण यांना ताब्यात घेवुन शासकीय वाहनात आणले व सदर वाहनामध्ये कृत्रिम अंधार करुन लाचेच्या नोटा, सावंत व चव्हाण यांचे हात अँ.वा. दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर, सावंत यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर व चव्हाण यांच्या उजव्या हाताच्या बोटांवर अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. सदरच्या नोटा पुराव्याकामी पोनि कोळी यांनी ताब्यात घेतली. तसेच दोन्ही पंच व सापळा पथकासमक्ष सावंत व चव्हाण यांना त्यांचे नाव गाव याबाबत विचारणा केली असता चव्हाण यांनी त्यांचे नाव संतोष पांडुरंग सावंत, वय-51 वर्षे, खाजगी इसम (पद- हंगामी फेर रिविजन सर्वेअर) ग्रामपंचायत मौजे दारफळ सिना, ता.माढा, जि.सोलापूर रा. धर्माधिकारी प्लॉट, गणेश मंदिरा जवळ, परांडा रोड बार्शी, ता. बार्शी. जि.सोलापूर (गुरगुडे यांचे घरी भाडयाने) व अनिल मधुकर चव्हाण, वय-55 वर्षे, खाजगी इसम (पद- हंगामी फेर रिविजन सर्वेअर) ग्रामपंचायत मौजे दारफळ सिना, ता.माढा, जि.सोलापूर, रा. शंभर फुटी रोड, नाईकवाडी प्लॉट, बार्शी, ता. बार्शी. जि.सोलापूर असे सांगितले. त्यांना पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घेत असल्याचे पोनि कोळी यांनी मला व दोन्ही पंचांना सांगितले. त्यानंतर मी पंच क्र.1 जाधव असे माझ्या मोटार सायकलवरुन, सापळा पथक, सावंत व चव्हाण, पंच क्र.2 असे शासकीय वाहनाने शासकीय विश्राम गृह, कुर्डूवाडी येथे आलो व सदरबाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्राम गृह कुर्डूवाडी ता.माढा येथे दि.06.09.2022 रोजी पूर्ण करण्यात आली.

तरी माझे वडीलांनी मृत्युपुर्वी करुन दिलेल्या बक्षीसपत्राप्रमाणे मौजे दारफळ सिना ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत क्र. 298 व 330 तसेच प्लॉट क्र.879 वर ग्रामसेवक यांचेशी असलेल्या ओळखीचा वापर करुन माझे मिळकतीवर ग्रामपंचायत दप्तरी नोंद करणेकामी खाजगी फेर सर्वेअर सावंत व चव्हाण यांनी दि 30.08.2022 रोजीचे 13.39 ते 16.36 वा सुमारास माझ्याकडे 10000/- रु लाचेची मागणी करुन तडजोडी अंती पहिला हप्ता 8,000/- रुपये व उर्वरित 2000/- रुपये नोंद झाले नंतर घेण्याचे मान्य करुन आज दि.06.09.2022 रोजी 12.44 वा. च्या सुमारास माढा बस स्टॅण्ड समोरील येवले चहाच्या शेजारील हॉटेल स्वप्नपुर्ती मध्ये पहिला हप्ता 8000/- रुपये खाजगी इसम फेर सर्वेअर सावंत यांनी मागणी करुन ती लाच रक्कम चव्हाण यांनी स्वत: स्विकारुन सावंत यांच्याकडे देवून गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी संतोष पांडुरंग सावंत व अनिल मधुकर चव्हाण यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा जबाब दिला स.ता.म

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

sham vinayakrao buwa(I (Inspector)) / **or (**किंवा**)**

**(2) Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

**(3) Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

... करण्यास नकार दिला)

(4) Tra... ed t...
(...हा ... अ...ल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on p... of jur...ction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R ... complainant / informant,admitted to be correctly rec... gi...en to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर ... दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला ... प्रत मोफत दिली.)

**R.O A.C.** (... )

**14 Si... ssion of the co...**
(... /अंगठा):

**15.Da... patch to the court**
(... वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकारी-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sham vinayakrao bu
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):